**प्रेसनोट** दि. 29/08/2026

| अ.क्र | शिर्षक | तपशिल |
|---|---|---|
| 1 | **घटक** | **पुणे घटक** |
| 2 | **तक्रारदार** | पुरुष, वय 37 वर्षे, व्यवसाय- लायसन्स कन्सल्टंट |
| 3 | **आरोपी** | 1) आबा सावळा वळकुंदे, वय- 48 वर्षे, व्यवसाय- खाजगी वाहन चालक, रा. वळकुंदे मळा, 61 फाटा, ता.माळशिरस, जि.सोलापूर (खाजगी इसम)<br>2) महादेव पंढरी माने , वय 39 वर्षे, रा.,मोटेवाडी, ता.माळशिरस , जि. सोलापूर, (खाजगी इसम)<br>3) अनिल महादेव शिंदे, पद पोलीस हवालदार बक्कल नंबर 1659 , नेमणूक नातेपुते पोलीस स्टेशन, कर्तव्यार्थ सध्या उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, अकलूज, पत्ता वन अकलूज सोसायटी पोलीस कॉलनी मागे, अकलूज तालुका माळशिरस जिल्हा सोलापूर<br>4) राहुल मारुती वाघ, पद पोलीस हवालदार ब नं 1818, माळशिरस पोलीस स्टेशन, पत्ता अकलूज पोलीस लाइन, अकलूज तालुका माळशिरस जिल्हा सोलापूर |
| 4 | **तक्रार** | **तारीख** - 29/08/2026<br>**तक्रार स्वरुप** – दिनांक 21/08/2026 रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, त्यांचे भाऊ व इतर व्यक्ति यांच्याविरूध्द अकलुज पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल न करण्यासाठी लोकसेवक अनिल शिंदे याने तक्रारदार यांच्याकडे स्वतः करिता व उप विभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके यांच्या करिता 25 लाख रुपये लाच मागणी केली त्यास तक्रारदार यांनी नकार दिल्यानंतर तक्रारदार यांचे भाऊ व इतरांचे विरोधात अकलूज पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.564/26 प्रमाणे गुन्हा दाखल केला. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी लोकसेवक अनिल शिंदे यांनी खाजगी इसम आबा वळकुंदे याचे मोबाईल फोनव्दारे तक्रारदारांशी संपर्क साधून तक्रारदार यांना तुम्ही जर यापूर्वीच पंचवीस लाख रुपये दिले असते तर गुन्हा दाखल झाला नसता असे म्हणून त्या गुन्ह्यात अटकपूर्व जामीन मिळण्याकरिता तसेच पीसी अँड पीएनडीटी या कायद्याची कलमे न लावण्याकरिता गुन्हयाचे तपास अधिकारी डीवायएसपी संतोष वाळके यांच्याकरिता 25 लाख रुपये व काम झाल्यानंतर स्वतःसाठी पाच लाख रुपये अशी लाच मागणी करून लोकसेवक अनिल शिंदे यांनी 10,00,000/- रुपये लाच स्विकारली व उर्वरित पंधरा लाख रुपयांची लाच मागणी केली अशी तक्रार, तक्रारदार यांनी अँटी करप्शन ब्युरो, पुणे येथे दिली आहे. |
| 5 | **तक्रारीची पडताळणी** | दिनांक 21/08/2026 रोजीच्या तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 24/08/2026 रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता, खाजगी इसम आबा वळकुंदे यांनी तक्रारदार यांच्याकडे दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार यांचे वरील कामासाठी पोलीस अनिल शिंदे व डी वाय एस पी वाळके यांचेकरिता रुपये 25 लाख लाचेची मागणी केली व गुन्ह्यातील इतर दोन आरोपींसाठी यापूर्वी लोकसेवक अनिल शिंदे यांनी दहा लाख रुपये लाचेची रक्कम स्वीकारल्याचे मान्य केलेचे निष्पन्न झाले.<br>त्यानंतर दिनांक 27/08/2026 रोजी केलेल्या लाच मागणी पडताळणी कारवाईदरम्यान खाजगी इसम आबा वळकुंदे व महादेव माने यांनी तक्रारदार यांचे आई-वडिलांना गुन्ह्यात अटक न करण्यासाठी व बी एन एस एस 35 (3) अन्वये नोटीस देण्यास सांगतो असे बोलून तपास अधिकारी डीवायएसपी वाळके यांचेकरिता रुपये पाच लाख व वाघ पोलीस यांचेकरिता रुपये 50,000/- अशी एकूण रू.5,50,000/- लाचेची मागणी करून सदर रक्कम दुसरे दिवशी म्हणजेच दिनांक 28/08/2026 रोजी फोन करून घेऊन येणेस सांगतल्याचे व त्यास लोकसेवक राहुल मारुती वाघ यांनी अपप्रेरणा दिल्याचे निष्पन्न झाले आहे. |
| 6 | **सापळा कार्यवाही** | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे युनिट कडून दिनांक 28/08/2026 रोजी सापळा कारवाई आयोजीत केली असता, यातील नमूद खाजगी इसम आबा वळकुंदे |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | व खाजगी इसम महादेव माने यांनी तक्रारदार यांचे आई-वडिलांना अटक न करता नोटीस देण्यासाठी पंचासमक्ष लोकसेवक वाघ यांचेकरिता रुपये 5,50,000/- लाचेची रक्कम पालखी महामार्गावरील माळशिरस पिलीव रोडच्या ब्रिज खाली जानकर प्लॉट शेजारी, माळशीरस, ता. माळशिरस, जि. सोलापूर येथे पंचासमक्ष 14.30 वाजता स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |
| 7 | **गुन्हा रजिस्टर नं./ कलम/पोलीस स्टेशन/ जिल्हा,दिनांक व वेळ** | माळशिरस पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7, 7अ, 12 प्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| 8 | **आरोपी अटक दिनांक,वेळ** | आरोपी न.1 व 2 यांना दि. 29/08/2026 रोजी 14.30 वाजता ताब्यात घेण्यात आले आहे. |
| 9 | **सापळा अधिकारी** | श्रीमती निता मिसाळ,पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि, पुणे, मो. नं. 9822214414 |
| 10 | **पर्यवेक्षण अधिकारी** | श्री. सतिश वाळके, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि, पुणे, मो. नं. 8087002020 |
| 11 | **सापळा पथक** | 1) मिथुन म्हात्रे (पोलीस निरीक्षक) 2) राजेश बाटे (सहा. फौजदार)<br>3) प्रवीण तावरे (पोलीस कॉन्स्टेबल) 4) अश्विन कुमकर (पोलीस कॉन्स्टेबल)<br>5) दगडू सोनावणे (चा.पोलीस हवालदार) 6)चंद्रकांत कदम(चा.पोलीस कॉन्स्टेबल) |
| 12 | **मार्गदर्शन** | 1)श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.पुणे, मो.नं. -9823167154<br>2)श्री.अजित पाटील, अपर पोलीस अधीक्षक-1,ला.प्र.वि.पुणे,मो.नं. 9029030530 |
| 13 | लाच लुचपत प्रतिबंधक विभागामार्फत नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाविरुद्ध तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी खालील नमूद केल्याप्रमाणे संपर्क साधावा. | |

| | **घटक कार्यालय** | **परिक्षेत्र कार्यालय** | **ला.प्र.वि, मुख्यालय** |
|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 |
| पत्ता | पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालय, सी बराक, सेंट्रल बिल्डिंग, पुणे, 411001 | पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र,सी बराक, सेंट्रल बिल्डिंग, पुणे, 01 | ला.प्र. वि. मुख्यालय कार्यालय, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई, 400030 |
| दुरध्वनी क्रमांक, व्हॉटसअप क्रमांक | (020)26132802, व्हॉटस्अॅप क्र.9403781064, 1064 | (020) 26122134, 1064 | (022) 24921212 |
| ई- मेल आय.डी. | dyspacbpune@mahapolice.gov.in | spacbpune@mahapolice.gov.in | acbwebmail@mahapolice.gov.in |

(सतिश संभाजी वाळके)
सहा.पोलीस आयुक्त/पो.उप.अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे

Scanned by CamScanner